© 2024 IJNRD | Volume 9, Issue 2 February 2024| ISSN: 2456-4184 | IJNRD.ORG

IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# भारतीय आदिवासी समाज आणि नक्षलवाद

1) तेजराम यादव गायधने 2) डॉ. वासुदेव जे. चौधरी
संशोधक विद्यार्थी सहयोगी प्राध्यापक
विद्या विकास महाविद्यालय समुद्रपूर, जि. वर्धा, महाराष्ट्र,भारत


## गोषवारा

भारतात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण खूप अधिक आहे. आफ्रिका खंडानंतर सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या भारतामध्ये आहेत. परंतु विकासाच्या दृष्टिकोनातून बघितल्यास आदिवासी जमात आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहे मग ती भारतातील असो अथवा आफ्रीकेतील. जंगली डोंगराळ भागात या जमातीचे वास्तव्य आढळून येते. आदिवासी समाजाच्या आर्थिक क्रियांचे प्रमुख उद्दिष्टये म्हणजे उदरनिर्वाह करणे होय. भारतातील आदिवासींच्या आर्थिक समस्यांमध्ये आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या, कर्जबाजारीपणा, वेठबिगारी, आदिवासी क्षेत्रात बँक सुविधांचा अभाव, दारिद्य, बेरोजगारी, आरोग्य व पोषक अन्न, शाळा व महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या, या समस्यांचे मुळ कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव!

वर्तमान संशोधन लेखाचा मुख्य उद्देश भारतातील नक्षलवाद आणि आदिवासी जमातींशी संबधीत व्याख्यात्मक माहितीवर प्रकाश टाकणे आहे. येथे आम्ही नक्षलवाद त्याची उत्पत्ती, नक्षल चळवळीच्या कती आराखड्याची ठळक वैशिष्टये यांचा आढावा सादर करण्यात येईल. आदिवासी भागातील नक्षलवाद व त्याचा आदिवासी जमातीवर होणारा विपरित परिणाम व उपाययोजना याबाबतची चर्चा सुध्दा या लेखात करण्यात येईल. निष्कर्ष म्हणून असा युक्तीवाद करण्यात येईल की, नक्षलवाद ही समस्या सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या वितरणातील असमतोलाशी संबधित आहे. त्याचप्रमाणे अन्याय व शोषणाशी संबधीत आह.


मुख्य शब्द :– नक्षलवाद, आदिवासी, आदिवासी जमात, नक्षल चळवळ, माओवाद

## प्रस्तावना

आफ्रिका खंडातील एकूण आदिवासींच्या बेरजेनंतर आदिवासी लोकसंख्येमध्ये भारताचा जगात दूसरा क्रमांक आहे. 2011 च्या जनगणनेनूसार भारतातील एकूण आदिवासी लोकसंख्या 10,42,81,034 होती जी भारताच्या एकूण लोकसंख्येच्या 8.6 टक्के आहे. त्यापैकी सुमारे 86 टक्के आदिवासी लोकसंख्या मध्यप्रदेश, ओडिसा, छत्तीसगड, झारखंड, गुजरात, महाराष्ट्र, राजस्थान, आंध्रप्रदेश आणि आंध्रप्रदेश या नऊ राज्यात मध्यवर्ती पट्टयात केंद्रीत आहे. 10 टक्के आदिवासी आसाम अरूणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालॅंड, त्रिपूरा आणि सिक्किम या 8 ईशान्येकडील राज्यात राहतात आणि उर्वरित 4 टक्के आदिवासी उत्तरप्रदेश, उत्तराखंड, गोवा, बिहार, हिमाचल प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, जम्मू व कश्मीर, लद्दाक, दादरा आणि नगर हवेली, दमन आणि दिव, लक्षव्दिप, अंदमान आणि निकोबार बेटे या केंद्रशासित प्रदेशांमध्ये राहतात.[1]

आदिवासींनी डोंगराळ प्रदेशांचा समावेश असलेल्या वेगळया भागाचा ताबा घेतलेला आहे. आणि त्यांनी सर्वसाधारणपणे बाहेरील लोकांच्या घूसखोरीला आणि विशेषतः त्यांच्या भागात परकीय खुसखोरीचा जोरदार प्रतिकार केला. परकिय घुसखोरी आणि आदिवासी यांच्यात प्रदिर्घ संघर्षाचा पुरावा इतिहास देतो जेव्हा पूर्वीच्या लाकांनी त्यांच्या भागात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला तेव्हा आदिवासींनी उठाव केला होता त्यामुळे ब्रिटीशांना आदिवासींसोबत शांतता प्रस्थापित करण्यासाठी आदिवासी बहुसंख्य क्षेत्रांना अ–नियामक क्षेत्र म्हणून नियुक्त करावे लागले आणि अशा प्रकारे या क्षेत्रांच्या प्रशासनासाठी स्वतंत्र कायदे मान्य करावे लागले. हे

[1] CENSUS OF INDIA. (2011). Ministry of Home Affairs. Publication Division, New Delhi. 2013, 11-47.

वगळलेले आणि अंशतः वगळलेले क्षेत्र म्हणूण निर्दिष्ट केले गेले आणि आदिवासींच्या हिताचे रक्षण करण्यासाठी विशेष कायदे केले गेले.[2]

नक्षलवादाची उत्पत्ती

नक्षलवादाचे नाव आणि मूळ 1967 मध्ये पश्चिम बंगाल राज्यातील नक्षलबारी गावातील एका छोट्या घटनेला कारणीभूत आहे, ज्यामध्ये स्थानिक आदिवासी आणि इतर मागासलेल्या जातींच्या शेतकऱ्यांचा एक छोटा गट शोषण, अत्याचार आणि अत्याचाराच्या सरंजामशाही प्रथेविरूध्द उठला, ज्यामध्ये त्यांना कृषी उत्पन्नातील वाटा आणि उच्च जातीच्या जमिनदारांकडून योग्य मजूरी देण्याचे नाकारले गेल. 25 मे 1967 रोजी चारू मुझूमदार, जंगल सथाल आणि कनु सन्याल या तीघानी शेतकऱ्यांना एकत्रित करून आंदोलन केले, आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर पोलिसांनी गाळीबार केला.[3] त्याचा निषेध म्हणून डावी विचारसरणीने जनआंदोलनाचे स्वरूप धारण केले. पुढे चारू मुजूमदार, कनू सन्याल, आणि जंगल संथाल यांच्या नेतृत्वाखाली नक्षलवादी चळवळीने पश्चिम बंगाल राज्यातील जवळपास सर्व ग्रामिण भागावर नियंत्रण मिळविले. त्यांनी सामाजिक–न्याय आणि जुलमी सरंजामशाही व्यवस्थेचे उच्चाटन करण्याची मागणी केली. अनेक प्रकरणांमध्ये तक्रारींमुळे निर्माण झालेल्या निराशेमुळे त्यांनी राज्य संस्थांकडून न्याय मिळविण्यासाठी हिंसाचाराचा अवलंब केला. आंदोलनाच्या मुख्य मागण्यांमध्ये जमीन सुधारणा, कामगार सुधारणा, कृषी वन उत्पादनांना रास्त भाव, रोजगार हमी आणि खाणकामातील शोषण दूर करणे इ. मागण्या समाविष्ठ होत्या, ही चळवळ 1968 मध्ये शेजारच्या आंध्रप्रदेश राज्यात पसरली आणि तेलंगणा प्रदेशासह आदिलाबाद, श्रीकामुलम आणि विशाखापट्टणम या ईशान्येकडील जिल्ह्यांमध्ये तिचा केंद्रबिंदू होता. तिन्ही नेत्यांना त्यांच्या अतिरेकी कारवायांसाठी अटक करण्यात आली आणि 1972 मध्ये मुझूमदार यांचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला. फक्त सन्याल वाचला 7 वर्ष तुरूंगात घालविल्यानतर तो विविध प्रकारच्या डाव्या राजकारणात सामिल झाला. नक्षलबारीजवळील त्याच्या गावात त्याने 23 मार्च 2010 रोजी वयाच्या 82 व्या वर्षी त्याच्या मूळ गावी गळफास लावून आत्महत्या केली.[4] चळवळीत चढ उतार होते पण 1980 मध्ये भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी–लेनिनवादी) या चळवळीने कळस गाठला, चारू मुझूमदार यांचे सहकारी कोंडापल्ली सीतारामय्या यांनी पीपल्स वॉर ग्रुप ;च्ॅळद्ध ची स्थापणा केली. पुढे केवळ आंध्रप्रदेशच नव्हे तर लगतच्या राज्यांमध्ये सुध्दा हो संघटना सर्वात भयंकर नक्षलवादी संघटना म्हणून उदयास आली. हा डाव्या विचारसरणीचा अतिरेकी गट आर्थिक अन्याय, बेरोजगारी, दारिद्र्य, जमिन सुधारणा, विकासाचा अभाव, आणि तकारिची अवहेलना यांच्याशी निगडीत आहे. आंध्रप्रदेश बिहार कर्नाटक,मध्यप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, महाराष्ट्र, ओडिशा, राजस्थान, तामिलनाडू, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल या 12 मोठ्या राज्यांमध्ये दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण गरीबांपैकी 90 टक्क्याहून अधिक गरीब लोक राहतात. असे काही अभ्यासातुन समोर आले आहे. बंगाल या राज्यामध्ये नक्षलवादी वेगवेगळ्या प्रमाणात सक्रिय आहेत हा योगायोग नाही नक्षलवादी समर्थक गरीब विचारसरणीचे विद्यार्थी समाजातील तरूणांमध्ये तीव्र आकर्षण आहे.

पीपल्स वॉर ग्रुप आणि नक्षल चळवळ या दोन्ही कृती आराखड्याची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.[5]

नक्षलवादी चळवळीच्या चळवळीच्या कृती आराखड्याची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे

- मोठ्या जमीनदारांकडून शेतजमिनी कमी आणि जादा जमिनीचे पुर्नवितरण
- शेतमजुरांना किमान मजुरी देण्याची अमलबजावणी करणे
- भ्रष्ठ ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर कर आणि दंड आकारणे, तक्रारीचे निवारण आणि पीडीत पक्षांना विनामूल्य जलद न्याय मिळवून देण्यासाठी लोक न्यायालये आयोजित करणे.
- जलद न्याय प्रशासनासाठी आदिवासी भागात समांतर सरकार चालविणे, या चालू वर्षाची पूर्तता करण्यासाठी कंत्राटदार आणि श्रीमंतांकडून निधी गोळा करणे.
- या विचारसरणीचा संदेश पसरविण्यासाठी खंडणीसाठी लोकांचे अपहरण
- पेलिस कर्मचाऱ्यांवर त्यांची ताकद दाखविण्यासाठी प्रतीउत्तर उपाय म्हणूण हल्ला करणे.
- राज्य अधिकार कमी करण्यासाठी सरकारी मालमत्ता नष्ट करणे.
- सामाजिक संहितेची अंमलबजावणी करणे

[2] MAJUMDAR D. N. (1982). “An Appraisal of the Tribal Situation in North East India”, In Pankaj Thakur (ed.), India’s North East. Tinsukia: Prakash Publishing House, 8.
[3] LOYD, ANTHONY (2015). "India's Insurgency". National Geographic (April): 84. Retrieved 13 March 2018
[4] LOYD, ANTHONY (2015). "India's Insurgency". National Geographic (April): 84. Retrieved 13 March 2018

[5] LOYD, ANTHONY (2015). "India's Insurgency". National Geographic (April): 86. Retrieved 13 March 2018 https://www.nationalgeographic.com/magazine/2015/04/indiacoal-conflict-minerals-maoist-insurgency/

International Research Journal
IJNRD
Research Through Innovation

पीपल्स वॉर ग्रुप गेली चार दशके अत्याचारीत आणि शोषित आदिवासी आणि गरीब शेतकऱ्यांच्या चळवळीचे नेतृत्व करित आहे. आणि अनेक विचलित लोकांना असे वाटते कि राजकारणी वर्षानुवर्षे जे आश्वासन देत होते ते नक्षलवाद्यांनी साध्य केले परंतु ते पूर्ण करण्यात अपयशी ठरले. बंदुकीची ताकद आजमावल्यानंतर, नक्षलवादी गट हळुहळू मतपेटीद्वारे मानवी हक्क आणि नागरी स्वातंत्र्याच्या मुद्यावर लक्ष केंद्रीत करीत आहेत.

माओवादी हाणामारी

2008, 2009, 2010 मधील काही उदाहरणांनूसार नक्षलवादी अतिरेकी, ज्याला माओवादी मायहेम देखील म्हटले जाते. अलिकडच्या वर्षात वाढले आहे. आरीसाच्या नयागड जिल्ह्यातील पोलीस ठाण्यावर 15 फेब्रुवारी 2008 रोजो नक्षलवादी हल्ले भारतासाठी एक वेक अप कॉल मानले गेले. 12–13 जुलै 2009 रोजी राजनांदगांव जिल्ह्यातील 35 पोलिसांचे हत्याकांड (एका पोलिस अधिक्षकासह) किंवा 6 एप्रिल 2010 रोजी कांकेर जिल्ह्यातील सीआरपीएफ कॅम्पवर 76 निमलष्करी जवानांवर माओवाद्यांनी केलेला हल्ला या सगळ्यांची भयंकर आठवण आहे. नक्षलवाद्यांमुळे सुरक्षेचा धोका छत्तीसगड मध्ये 44 प्रवाशांचा बळी घेणाऱ्या एका नागरी बसची बोथट घटना देखील चिंतेची बाब आहे.[6] प्रत्येक दिवसागणिक, माओवादी गनिम भारताच्या अनेक भागांवर आपली पकड घट्ट करत आहेत. दरवर्षी सुमारे 600 लोकांचा बळी घेतात. 2005 ते 2010 पर्यंतच्या नक्षल हल्ल्यातील मृतांची वर्षनिहाय स्थिती आणि 1996 ते 2018 पर्यंतच्या हिंसाचारात झालेल्या मृत्यूची स्थिती खालील तक्ता 1 व 2 मध्ये दिली आहे.

तक्ता क्र. 1 2005 ते 2010 पर्यंतच्या नक्षल हल्ल्यातील मृतांची वर्षनिहाय स्थिती [7]

| वर्ष | सुरक्षा कर्मचारी | नागरिक | नक्षलवादी हल्ले | नक्षलवादी ठार |
|---|---|---|---|---|
| 2005 | 153 | 524 | 1608 | छं। |
| 2006 | 157 | 521 | 1509 | 274 |
| 2007 | 236 | 460 | 1565 | 141 |
| 2008 | 231 | 660 | 1591 | 199 |
| 2009 | 317 | 591 | 1130 | 217 |
| 2010 | 285 | 713 | छं। | 171 |
| 2011 | 142 | 447 | छं। | छं। |

तक्ता 2 : वर्ष 2000 ते 2022 पर्यंत हिंसाचारात झालेल्या मृत्यूंची वर्षनिहाय स्थिती[8]

| वर्ष | हिंसाचार घटना | नागरिक | सुरक्षा कर्मचारी | नक्षलवादी | ओळख न पटलेले | एकूण मृतांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 2000 | 116 | 94 | 40 | 135 | 9 | 278 |
| 2001 | 199 | 130 | 116 | 169 | 44 | 459 |
| 2002 | 182 | 123 | 115 | 163 | 30 | 431 |
| 2003 | 319 | 193 | 114 | 246 | 30 | 583 |
| 2004 | 127 | 89 | 82 | 87 | 22 | 280 |
| 2005 | 343 | 259 | 147 | 282 | 24 | 712 |
| 2006 | 248 | 249 | 128 | 343 | 14 | 734 |
| 2007 | 274 | 218 | 234 | 195 | 25 | 672 |
| 2008 | 246 | 184 | 215 | 228 | 19 | 646 |
| 2009 | 407 | 368 | 319 | 314 | 12 | 1013 |
| 2010 | 481 | 630 | 267 | 265 | 18 | 1180 |
| 2011 | 302 | 259 | 137 | 210 | 0 | 606 |
| 2012 | 235 | 156 | 96 | 125 | 1 | 378 |
| 2013 | 186 | 164 | 103 | 151 | 0 | 418 |
| 2014 | 185 | 127 | 98 | 121 | 4 | 350 |
| 2015 | 171 | 90 | 56 | 110 | 0 | 256 |
| 2016 | 263 | 122 | 62 | 250 | 0 | 434 |
| 2017 | 200 | 107 | 76 | 152 | 0 | 335 |
| 2018 | 218 | 108 | 73 | 231 | 0 | 412 |

[6] VERMA, R.C. (2018). Indian Tribes: Through the Ages. Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India. 238.
[7] VERMA, R.C. (2018). Indian Tribes: Through the Ages. Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India. 232
[8] South Asian Terrorism Portal, 2022. https://www.satp.org/datasheet-terrorist-attack/fatalities/india-maoistinsurgency

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2019 | 176 | 99 | 49 | 154 | 0 | 302 |
| 2020 | 138 | 61 | 44 | 134 | 0 | 239 |
| 2021 | 124 | 58 | 51 | 128 | 0 | 237 |
| 2022 | 62 | 34 | 12 | 31 | 0 | 77 |
| ,dw.k | **5202** | 3922 | 2634 | 4224 | **252** | 11032 |

**Data since March 6, 2000, ** Data till , July 05, 2022**
**Source: Compiled from news reports and are provisional.**
Source: South Asian Terrorism Portal, 2022.

नक्षलवाद हा भारताच्या सुरक्षेसाठी सर्वात मोठा धोका मानला जातो भारतातील अनेक राज्ये काही काळापासून माओवाद्यांशी लढण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु फारशे यश मिळाले नाही. राज्यांनी त्यांची संसाधने एकत्र करणे आणि डाव्या विचारांच्या बंडखोरीला कायमचे चिरडणे आवश्यक आहें. साठच्या दशकाच्या उत्तरार्धात ज्या कारणांनी देशात नक्षलवादाला जन्म दिला ते घटक आजही तिव्र आणि उग्र स्वरूपात आहेत. राजकीय प्रक्रियेतील विश्वासाचा ऱ्हास, मानवजातीच्या मोठ्या जनसमुदायाचे दारीद्र्य, आर्थिक विषमता, वाढती बेरोजगारी, आदिवासींवरील अन्याय, वाढणारा सामाजिक तणाव आणि लोकांच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यात प्रशासनाला आलेले अपयश या सर्वांचा फटका बसत आहे. आणि अत्यंत अधिभारीत परिस्थितीकडे नेत आहेत.[9]

आदिवासी भागातील नक्षलवाद

भारतात सुमारे 80 दशलक्ष आदिवासी अजुनही सर्वात असुरक्षित आणि गरिबांपैकी सर्वात गरीब मानले जातात. दारीद्र्यरेषेखालील आदिवासी लोकसंख्येचा एक मोठा भाग उपासमारी आणि कुपोषणाचा बळी आहे.[10] आदिवासी उपासमारीने मरत आहेत. जे अन्न असुरक्षिततेमुळे होते आणि गरीबीमुळे होते. आणि त्या बदल्यात उपासमारीने मृत्यू होतो. ज्यामुळे एक प्रकारची परिस्थिती निर्माण होते. या समाजात दशहत आहे. त्यामुळे आदिवासींच्या भुकेचा वापर दहशतीचे हत्यार म्हणूण केला गेलेला आहे. जेणेकरून त्यांना संपूर्ण अधिनता आणि अंतर्गत वसाहतीच्या अवस्थेत ठेवता येईल.

नक्षलवादाची कारणे

आदिवासींमधील नक्षलवादाची मूळ कारणे थेट सामाजिक आर्थिक आणि राजकीय तक्रारींशी जोडलेले आहेत. ज्यात वंचितता, अधोगती, शोषण, गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता, अत्याचार आणि ऐतिहासिक चुका यांचा समावेश होतो. आदिवासींना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी त्यांचे सक्षमीकरण आणि विकास या दुहेरी उदिष्टांसह घटनात्मक संरक्षण असुनही त्यांना सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय आणि मानवी हक्क नाकारले गेले आहेत. अतिदुर्गम भागातील आदिवासींची दयनिय अवस्था व त्यांची निरक्षरता आणि अमानवी परिस्थितीत दारिद्र्यरेषेखाली राहतात. त्यांना त्यांच्या जमीनीचे हक्क आणि वनक्षेत्राशी संबधीत अधिकारांपासून मनमानीपणे वंचित ठेवले जाते. अनुसूचित क्षेत्रातही त्यांच्या जमिनी सुरक्षित नाही आणि त्यांना पुरेशा पुनर्वसन पॅकेजशिवाय अंदाधुंद विस्थापणाचा सामना करावा लागत आहे. शिवाय सावकारांकडून आणि त्यांच्या तथाकथित कल्याणात गुंतलेल्या सरकारी संस्थाद्वारे त्यांचे शोषण केले जाते. आदिवासींसाठी लोकशाहीचा फारसा अर्थ नाही कारण इतर गोष्टींबराबरच त्यांचा आदिवासी विषयांवर निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत कोणताही सहभाग न घेता लोकशाहीसाठी व्होट बॅंक म्हणूण वापरला जात आहे.[11]

आदिवासी हे वाईट प्रशासन आणि शोषणाचे असहाय्य बळी आहेत. आणि आदिवासी लोकांचा कमी होत चाललेला संसाधन आधार, जमीनीची हानी, वनोपजांवर प्रवेशांवरील निर्बंध आणि वाजवी वेतनाच्या रोजगाराच्या संधीचा अभाव या स्वरूपात मोजले जाऊ शकते. परिणामी या लोकांच्या फायद्यासाठी विकासात्मक इनपुटवर फारसा परिणाम झाला नाही. लक्षणियरित्या पारंपारिक आदिवासी संस्थात्मक संरचनात्मक विकास प्रक्रियांनी अनेक प्रकरणांमध्ये हस्तक्षेप केला आहे. आणि यामुळे अनेक नकारात्मक परिणाम झाले आहेत. बहुतेक आदिवासी भागात अशांतता निर्माण करण्यासाठी हे घटक कारणीभूत होत.[12]

हे आदिवासींच्या शोषण आणि दडपशाहीमळे उद्‌भवलेल्या निराशेच्या पार्श्वभुमीत होते ज्यामुळे त्यांनी नक्षलवाद्यांच्या आश्रयाखाली त्यांच्या हक्कासाठी लढण्यासाठी अनेक भागात शस्त्रे उचलली किंबहुना गेल्या काही वर्षात आदिवासी बंडखोरी हा नक्षलवादी आणि जनयुध्द समूह चळवळीचा प्रमुख भाग बनला आहे. सामाजिक आर्थिक आणि राजकीय घटकांच्या संयोजनामुळे भारतात डाव्या

[9] BIJOY, C, R. (2010). India and the Rights of Indigenous People, Asia Indigenous People Pact, Thailand, The World Bank, Poverty and Social Exclusion in India, 21 Oxford University Press, New Delhi.
[10] MEHTA P. C. (2004). Ethnographic Atlas of Indian Tribes. 17 New Delhi: Discovery Publishing House.
[11] SINGH, P. (1999). The Naxalite Movement in India., 101, New Delhi: Rupa & Co., 1999. & VERMA, R.C. (2018). Indian Tribes: Through the Ages, 239, Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India.
[12] SINGH, P. (1999). The Naxalite Movement in India., 101, New Delhi: Rupa & Co., 1999.

विचारसरणीचे अतिरेकी आणि नक्षलवादी चळवळीचे पुनरूत्ाीन झाले आहे. नक्षलवादी विचारसरणी जात, धर्म आणि क्षेत्राचे अडथळे ओलांडून लोकांना व्यापक आर्थिक मुद्यांवर एकत्र आणण्याचा प्रयत्न करते.[13]

हिंसक चळवळीत अडकले आदिवासी

आदिवासी लोकांच्या मते जमीन पाणी, खनिजे, गरीबी, आणि बंदुका या सर्व गोष्टी त्यांच्या अस्तित्वासाठी जोडलेल्या आहेत. भारताच्या मध्यभागी अशी आदिवासी गावे आहेत जिथे लोकांनी डॉक्टर, शिक्षक, नळाचे पाणी किंवा विज पाहिलेली नाही. आणि शिवाय ते घनदाट जंगलाच्या मध्यभागी राहतात. धोकादायक प्राण्यांबरोबर जागा सामाईक करतात. सुपीक जमिन व्यापलेली असतांना त्यांना अजुनही उपासमारीने सतावलेले आहे. आणि देशातील सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या असलेल्या छततीसगडमध्ये मूलभूत मानवी गरजा आणि पिण्याचे पाणी, अन्न, आरोग्य, वीज आणि शिक्षण या सारख्या नागरी सुविधांचा अभाव आहे. हिंसाचाराच्या पकडीतील भागही पोलिसांच्या अवाक्याबाहेर आहे. लोक भुकेलेले आहेत. आणि त्यांना रानटी जीवन जगण्यास भाग पाडले आहे.[14]

झारखंड, ओडिशा, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, यांसारख्या इतर राज्यांतील आदिवासी भागातही हीच कथा आहे. 50 टक्के पेक्षा जास्त आदिवासी गावे रस्ते वीज पिण्यायोग्य पाणी आणि आरोग्य केंद्रे आणि शिक्षण सुविधांशिवाय आहेत.खाण कंपन्या येऊन खानिज संपत्ती घेऊन जातात हे ऐकल्यावर ते संतापतात यात नवल नाही त्यांना त्यांची जमिन परत हवी आहे. त्यांना त्यांचे जंगल अबाधित हवे आहेत. आणि इतरांनी त्यांच्या खनिजाचे शोषण करू नये असे त्यांना वाटते. सर्व काही त्यांच्या हातातुन निसटतांना पाहून ते बंदुकांकडे वळतात. आता आदिवासी संतापाने पेटले आहेत. जेव्हा माओवादी गावात येऊन सभा घेतात आणि क्रांतीची चर्चा करतात तेव्हा लोक ऐकतात. आदिवासींना हे समजते की त्यांना सन्मानाने जगण्याची संधी कधीच दिली गेली नाही, तरीही ते त्यांच्या वतीने युध्द पुकारत असल्याचा दावा करणारे बंडखोर असणि त्यांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करत असलेले राज्य यांच्यातील प्राणघातक गोळीबारात ते अडकलेले आहेत.[15]

सुचक उपाय

1 ग्रामपातळीवर लोकशाही आणि सुशासनासाठी पंचायतींच्या अनुसूचित क्षेत्रापर्यंत विस्तार ;च्मै।द्ध च्या संविधानाच्या भाग  प्ग आणि प्ग। च्या दरतुदीची अमलबजावणी करून पंचायती राज संस्थेला अधिकाराचे विकेंद्रीकरण अ) फंक्शन्स ब) फंक्शनरी क) फायनान्सचे डिव्होल्युशन असावे जिल्हा नियोजन समित्या गठित करण्यात आणि विकासाच्या योजनांच्या अमलबजाबवणीसाठी ला स्वतंत्र बजेट वाटप करण्यात यावे.[16]

2 अनुसूचित जमाती आणि इतर पारंपारिम वननिवासी (वन हक्काची मान्यता) कायदा 2006 आणि नियम 2007 ची अमलबजावणी आदिवासींवरील ऐतिहासिक अन्याय पूर्ववत करण्यासाठी शक्य तितक्या लवकर करण्यात यावी.[17]

3 रामू रेडडी खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या ;।प्ग 1988 ब्द्ध निकालानुसार आदिवासींच्या जमिनीच्या हक्काचे संरक्षण आणि समता निर्णय ;।प्ग 1997 ब्द्ध नुसार आदिवासींच्या खाण हक्कांचे संरक्षण सुनिश्चित केले जावे.

4 धोरण नियोजन आणि विकासाच्या बाबतीत सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय आदिवासी सल्लागार परिषद स्थापण करावी.

5 आदिवासी विकासासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प शिर्षकाखाली केंद्र सरकार आणि योजना आयोगाकडून निधीचे वेगळे परिमाण असावे.

6 भारत सरकारने प्रायोजित केलेल्या कार्यकम आणि योजनांच्या निधीवर देखरेख आणि अमलबजावणीसाठी आदिवासी व्यवहार मंत्रालयाला नोडल प्रशासकिय मंत्रालय म्हणून अधिसुचित केले जावे.

7 भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी सांगितलेल्या आदिवासी पंचशील या संवैधानिक हमी आणि धोरणात्मक मार्गदर्शक तत्वे लक्षात घेऊन आदिवासी कार्य मंत्रालयाने आदिवासी सक्षमीकरणाचे सर्वसमावेशक धोरण तयार केले पाहिजे जे त्यांच्या कारभारासाठी आदिवासींवर अवलंबून होते.

---

[13] HOOJA, M. (2004). Policies and Strategies for Tribal Development: Focus on the Central Tribal Belt,16, New Delhi: Rawat Publications. & VERMA, R.C. (2018). Indian Tribes: Through the Ages, 256, Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India.
[14] LOUIS, P. (2008). Rights of Scheduled Tribes of India.17, MANAK Publication Pvt. Ltd, New Delhi.
[15] LOUIS, P. (2008). Rights of Scheduled Tribes of India. 15, MANAK Publication Pvt. Ltd, New Delhi.
[16] MINISTRY OF TRIBAL AFFAIRS. (2015). Annual Report 2015-16.,33, New Delhi: Government of India.
[17] MINISTRY OF TRIBAL AFFAIRS. (2015). Annual Report 2015-16.,3, New Delhi: Government of India.

**निष्कर्ष**

**नक्षलवाद ही कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या नाही परंतु ती मुळात सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या वितरणातील असमतोल, सामाजिक आर्थिक समस्या, विशेषतः जमिन आणि खनिज संपत्तीशी संबधित आहेत न्यायप्रशासनात लोकसहभागासाठी पंचायती राज संस्थांना अधिकाराचे प्रभावी वाटप झाले पाहिजे आणि मूळ स्तरावर त्यांच्या कारभाराचे व्यवस्थापण केले गेले पाहिजे या दिशेने सरकारचे प्रामाणिक प्रयत्न नक्षलवाद आटोक्यात आणण्यासाठी खूप मदत करतील.**

## lanHkZxzaFk


CENSUS OF INDIA. (2011). Ministry of Home Affairs. Publication Division, New Delhi. 2013, 11-47.

[1] MAJUMDAR D. N. (1982). "An Appraisal of the Tribal Situation in North East India", In Pankaj Thakur (ed.), India's North East. Tinsukia: Prakash Publishing House, 8.

[1] LOYD, ANTHONY (2015). "India's Insurgency". National Geographic (April): 84. Retrieved 13 March 2018[1] LOYD, ANTHONY (2015). "India's Insurgency". National Geographic (April): 84. Retrieved 13 March 2018.

[1] VERMA, R.C. (2018). Indian Tribes: Through the Ages. Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India. 238.

[1] VERMA, R.C. (2018). Indian Tribes: Through the Ages. Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India. 232

[1] South Asian Terrorism Portal, 2022. https://www.satp.org/datasheet-terrorist-attack/fatalities/india-maoistinsurgency

[1] BIJOY, C, R. (2010). India and the Rights of Indigenous People, Asia Indigenous People Pact, Thailand, The World Bank, Poverty and Social Exclusion in India, 21 Oxford University Press, New Delhi.

[1] MEHTA P. C. (2004). Ethnographic Atlas of Indian Tribes. 17 New Delhi: Discovery Publishing House.

[1] SINGH, P. (1999). The Naxalite Movement in India., 101, New Delhi: Rupa & Co., 1999. & VERMA, R.C. (2018). Indian Tribes: Through the Ages, 239, Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India.

[1] SINGH, P. (1999). The Naxalite Movement in India., 101, New Delhi: Rupa & Co., 1999.
[1] HOOJA, M. (2004). Policies and Strategies for Tribal Development: Focus on the Central Tribal Belt,16, New Delhi: Rawat Publications. & VERMA, R.C. (2018). Indian Tribes: Through the Ages, 256, Publication Division, Ministry of Information and Broadcasting, Government of India.

[1] LOUIS, P. (2008). Rights of Scheduled Tribes of India.17, MANAK Publication Pvt. Ltd, New Delhi.
[1] LOUIS, P. (2008). Rights of Scheduled Tribes of India. 15, MANAK Publication Pvt. Ltd, New Delhi.
[1] MINISTRY OF TRIBAL AFFAIRS. (2015). Annual Report 2015-16.,33, New Delhi: Government of India.
[1] MINISTRY OF TRIBAL AFFAIRS. (2015). Annual Report 2015-16.,3, New Delhi: Government of India.


IJNRD Research Through Innovation